जा .क्र. तंशिविकापु/आस्था-३(१)/मराठी भाषा /२०१९/ 4433

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६
दिनांक : २३/१०/२०१९
30 OCT 2019

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था व कार्यालये,
यांना माहिती व कार्यवाहीसाठी

संदर्भ :-१)महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रं.२संकीर्ण-२०१९/सं.क्र.(१२५१/१९)तांशि-१ दि.०३/१०/२०१९
२) संचालनालयाचा दिनांक १६/०१०/२०१९ रोजीचा ईमेल

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन करण्यात येवून त्यासोबत जोडलेल्या मराठी भाषा समिती प्रश्नावलीतील मुद्यांबाबतची माहिती दिनांक ३०/१०/२०१९ पर्यंत **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी. याबाबतची माहिती निरंक असल्यास तसेही या कार्यालयास कळविण्यात यावे.

**सोबत : मराठी भाषा समिती प्रश्नावली**

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

महाराष्ट्र शासन

क्र:-संकीर्ण-२०१९/सं.क्र.(१२५१/१९)/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
दालन क्र. ४४१, ४ था मजला,
विस्तार इमारत, मंत्रालय,
मादाम कामा रोड, मुंबई-३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३१६५
दि. ०३ ऑक्टोबर, २०१९.

पत्र प्राप्त झाले
- 3 OCT 2019
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई - ४०० ००१

**विषय: मराठी भाषा समितीस प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करून देणेबाबत**

**संदर्भ:** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.१८२७४/मविस/मराठी भाषा समिती, दि.२३.०९.२०१९

उपरोक्त संदर्भाधीन पत्राची व त्यासोबत प्राप्त झालेल्या प्रश्नावलीची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर प्रश्नावलीनुसार आवश्यक ती माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. २११: २६३८
दिनांक ०४/१०/१९

९२५९। तांत्रि-१
दि. ०३/१०/१९ विधान भवन

स्मरणपत्र क्र. : ४

१७३
२६/०९

बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक १८२७४/म.वि.स./मराठी भा.स.
दिनांक २३ सप्टेंबर, २०१९

प्रेषक :

श्री.राजेश तारवी,
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०००३२

प्रति :

१) श्री. भूषण गगराणी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
मराठी भाषा विभाग,
८ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

२) श्री.सौरभ विजय,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय : मराठी भाषा समितीस प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती अद्याप अप्राप्त असल्याबाबत.**

**संदर्भ :** (१) या सचिवालयाचे पत्र क्र.१०३८६/मविस/मराठी भाषा समिती, दिनांक ९ एप्रिल,२०१८.
(२) या सचिवालयाचे स्मरणपत्र १ क्र. २३०९१/मविस/मराठी भाषा समिती, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८
(३) या सचिवालयाचे स्मरणपत्र २ क्र. ७२६२/मविस/मराठी भाषा समिती, दिनांक ९ एप्रिल, २०१९
(४) या सचिवालयाचे स्मरणपत्र ३ क्र. १२९३६/मविस/मराठी भाषा समिती, दिनांक १ जुलै, २०१९

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन विषयाच्या अनुषंगाने निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या मराठी भाषा समितीने राज्यातील सर्व विद्यापीठांना प्रश्नावली पाठवून सदर प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्रश्न व उत्तर या स्वरुपातील माहितीच्या ५० प्रती या सचिवालयास पाठविण्याबाबत कळविले आहे..

तथापि, तीन स्मरणपत्रे पाठवून देखील अद्याप या सचिवालयास कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. सबब, सदर माहिती या सचिवालयातील मराठी भाषा समिती, कक्ष क्रमांक १२०४, १२ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे तात्काळ पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपला,
(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता:-

१) कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्र पेटी क्र. ८०, उमविनगर, जळगांव - ४२५ ००१
२) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४० ००१
३) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराटवाडा विद्यापीठ, विष्णूपुरी, नांदेड - ४३१ ६०६
४) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, विद्याविहार, लोणेरे, रायगड - ४०२ १०३
५) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४
६) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद - ४३१ ००४
७) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, १, नाथीबाई ठाकरसी मार्ग, मुंबई - ४०० ०२०
८) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, एम.जी. मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
९) कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३२५५

# मराठी भाषा समिती

## प्रश्नावली

१. शासकीय कार्यालये/मंडळे/महामंडळे/प्रधिकरणे शासन अंगिकृत व्यवसाय व या कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या इतर कार्यालयांचा तपशील देण्यात यावा. (आवश्यक तेथे कार्यालय प्रमुखांच्या पदनामांसह यादी जोडावी.)

२. शासकीय कार्यालये/मंडळे/महामंडळे/प्रधिकरणे यांच्या कार्यालयात एकूण किती कार्यासने/शाखा/कक्ष आहेत तसेच कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची एकूण मंजूर संख्या किती आहे याबाबतची माहिती वर्गवारीसह देण्यात यावी.

३. राज्य शासनाच्या सेवेत नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीनंतर अमराठी भाषिक (ज्यांची मातृभाषा मराठी नाही असे) अधिकारी/कर्मचाऱ्यांना किती कालावधीत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे शासन नियमानुसार बंधनकारक आहे ? अहवाल वर्षी (सन २०१७-२०१८) उत्तीर्ण न झालेल्या अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे ? अशा उमेदवारास परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किती संधी देण्यात येतात? जर असा उमेदवार परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यास त्याच्यावर कोणती कारवाई करण्यात येते?

४. लिपीक-टंकलेखक, लघुलेखक/लघु-टंकलेखक यांनी एतंदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत काय? नसल्यास सा.प्र.वि. अधिसूचना क्र. टंलेप्र १०८९/सीआर - ३४४/२०-ब, दिनांक ६ मे १९९१ अन्वये अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी रोखल्या आहेत काय?

५. राज्य शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखनाचे/टंकलेखनाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एतंदर्थ मंडळाची मराठी लघुलेखन/टंकलेखनाची परीक्षा देण्याबाबतचे निकष काय आहेत?

६. महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या (शासकीय, निमशासकीय, खाजगी) कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत?

७. कार्यालयाद्वारे/संस्थेद्वारे प्रसिध्द होणारी/ छापली जाणारी निवेदने, जाहिराती, अहवाल, माहिती किंवा सूचना इ. गोष्टी मराठीतूनच प्रसिध्द करण्यात येत आहेत काय?

..२/-

८. कार्यालयीन पत्रव्यवहार व नोंदवह्यांमध्ये वापरले जाणारे रबरी शिक्के व मुद्रा, कार्यालयातील हजेरीपट व समयोत्तर हजेरीपट मराठीत आहेत काय तसेच त्यावरील शेरे, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या मराठीतूनच प्रसिध्द करण्यात येत आहेत काय?

९. केंद्र/ राज्य शासनाकडून वेळोवेळी विविध कायदे/अधिनियम /नियम इ. प्रसिध्द केले जातात, त्यापैकी केंद्राकडून येणाऱ्या कायद्यांचे मराठीत भाषांतर करण्यासाठी नियोजनबध्द आखणी करण्यात आली आहे काय?

१०. याबाबत नियोजनबध्द आखणी करण्याकरीता विधी व न्याय विभाग, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग व विद्यापीठांमधील विधी शिक्षण विभाग यांच्या माध्यमातून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे काय?

११. कार्यालयाशी संबंधित विहित नमुने मराठीतून उपलब्ध आहेत काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

१२. राजभाषा मराठीच्या वापराबाबत आपल्या विभागाची/कार्यालयाची यापूर्वी तपासणी पथकाने तपासणी केली आहे काय? असल्यास, केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय?

१३. शासकीय कार्यालयामध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे काय?

१४. मराठीचे संगणकीकरण व संगणकाचे मराठीकरण करण्यासाठी सर्व स्तरावरील प्रशासनामध्ये युनिकोड प्रणाली व युनिकोड प्रणित मराठी यांचा सर्वत्र प्रसार करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत?

१५. संगणकावर युनिकोड प्रणालीच्या माध्यमातून मराठी भाषा कार्यान्वित करणे व टंकलेखन करणे यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन करण्याकरीता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत?

..३/-

१६. महाराष्ट्रातील सर्व शासकीय,निमशासकीय, अशासकीय खाजगी संस्था, कंपन्या, संघटना यांच्या संकेतस्थळांचे मराठीकरण होण्यासाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत काय?

१७. महाराष्ट्रात मराठी भाषेच्या सार्वजनिक वापराबाबत व शासकीय कार्यालयातील मराठीच्या वापराबाबत शासनाने प्रसिध्द केलेल्या (परिपत्रक/जी.आर.) शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येते किंवा नाही तसेच यावर कोणाचे व कशाप्रकारे नियंत्रण ठेवण्यात येत?

१८. मराठी भाषेच्या वापराबाबत टाळाटाळ करणारे अधिकारी/कर्मचारी आढळून आले आहेत काय? असल्यास, त्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना समज देण्यात आली आहे काय ? वारंवार समज देऊनही जे अधिकारी/कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करत नाहीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली आहे काय ?

१९. राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनसाठी समिती गठीत करण्यात आली आहे काय ? असल्यास त्यामध्ये एकूण किती सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे ? सदर समितीच्या आतापर्यंत किती बैठका झाल्या आहेत व त्यामध्ये कोणते कामकाज करण्यात आले ?

२०. शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे काय? नसल्यास सदर समिती गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

२१. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात येते काय ?

२२. राज्यातील विविध शासकीय कार्यालयांद्वारे नागरिकांना जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, अ-उत्पन्न गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, वय, अधिवास व राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक असल्याचे प्रमाणपत्र व वारसा हक्क दाखला अशी प्रमाणपत्रे मराठी भाषेतून देण्यात येत आहेत काय ?

२३. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र-मभावा १०९६/११६/प्र.क्र७/९६/२०-ब, दिनांकित. १० एप्रिल १९९७ अनुसार कार्यालयात १ मे हा "राजभाषा मराठी दिन" म्हणून साजरा करण्यात येतो काय ?